# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र. झोपुप्रा/प्र.शा./ जिअभूअ/ /झो.पु.क्षे.घो./ प्र.क्र. ६३/२०१७
दि. 18 DEC 2017

परिपत्रक क्र. 9L3

**विषय :- महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.,नि. व पु.) अधिनियम १९७१ चे कलम ३क (१) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे बाबत-सुधारीत कार्यपध्दती निश्चित करणे बाबत.**

**संदर्भ** :- १. परिपत्रक क्र. झोपुप्रा/ उजि / कार्या-२/ टे/डी-२/ परिपत्रक/ भू संपादन /२०१० /२७२१ दि.०६/१०/२०१०. (**परिपत्रक क्र ११८**)
२. परिपत्रक क्र. झोपुप्रा / नभू / कार्या-१/ टेएस-१/ झो.पु.क्षे.घो./२०१३ /२८६ दि.०८/०५/२०१३. (**परिपत्रक क्र १४२**)
३.परिपत्रक क्र. झोपुप्रा/उजि/ कार्या-/झो.पु.क्षे.घो./२०/२०१५दि.०८/०५/२०१३ (**परिपत्रक क्र.१७०**)
४. कार्यालयीन आदेश क्रं. झोपुयो / उजि/ कार्या/०५/२०१६, दिनांक १०.०१.२०१७.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ कलम ३ब पोट कलम १ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना सादर करुन ती दि.९ एप्रील १९९८ च्या राजपत्रात प्रसिध्द केली आहे. त्यानुसार झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरणाकडुन झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणे करीता बहन्मुबई महानगर पालिका क्षेत्रातील झोपडपट्टी क्षेत्रे ही महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ कलम ३ क (१) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणुन घोषित करणे करीता करावायाच्या कार्यवाहीबाबत वेळोवेळी प्राधिकरणाव्दारे काढण्यात आलेले संदर्भिय परिपत्रक क्र. ११८, १४२ ही परिपत्रके पुर्वीच रद्द करण्यात आली आहेत. आता परिपत्रक क्र. १७० व कार्यालयीन आदेश दिनांक १०.०१.२०१७ रद्द करण्यात येत असून, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे करीता यापुढे खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१. एखादे झोपडपट्टी क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणुन घोषित करणे करीता खालील व्यक्ती / संस्था अर्ज करु शकतात.

१) झोपडपट्टी क्षेत्राशी संबधीत मिळकतीचे धारक / मालक.

२) संबधीत झोपडपट्टी क्षेत्रातील रहिवाशांनी एकत्रीत येऊन स्थापन केलेली नियोजित सह. गृह. संस्था / संघ/ मंडळ.

३) नियोजित संस्थेने निवडलेले विकासक अथवा वास्तुविशारद.

२. अर्जदार यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज (नमुना अ) संबधीत उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे कडे सादर करावा व त्या सोबत नमुना 'अ' अर्जात नमूद कागदपत्रे आणि प्राधिकरणाने एम्पॅनलमेंट केलेल्या सर्व्हे एजन्सीकडून ETS/GPS ने मोजणी केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत

I.T-981
19/12/17



प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४००·०५१.
दूरध्वनी : २६५६ ५८००, २६५९ ०४०५ / ९८७९, फॅक्स : ०२२-२६५९ ०४५७, ई-मेल : info@sra.gov.in

करावयाचे क्षेत्राच्या झोपडीस्थित नकाशाची प्रत व GIS Data ची CD अर्जासोबत सादर करावी. उपजिल्हाधिकारी कक्षाने अर्जासोबत परिपुर्ण कागदपत्रे असल्याची खात्री करुन अर्ज स्विकारावा.

३. उपजिल्हाधिकारी विभागाव्दारे नोंदविण्यात आलेला प्रस्ताव जमिनीची मालकी, घोषित करावयाचे क्षेत्राचा स्थळदर्शक नकाशा, घोषित करावयाचे प्रस्तावित क्षेत्र, चतु:सिमा, जागेवरील सद्यस्थिती इ. बाबतचा अहवाल व अधिसुचनेचे प्रारुप तयार करणे करीता नगर भूमापन विभागाकडे पाठविण्यात येईल.

४. नगर भूमापन विभागातील संबधीत परिरक्षण भूमापक हे अर्जदार यांनी सादर केलेल्या GIS Data चे नकाशाचे आधारात झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणुन घोषीत करावयाच्या क्षेत्राची खात्री करतील तसेच मालकी हक्क तपासुन त्याबाबतचा अहवाल, नगर भूमापन हद्दीसह झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करावयाचे क्षेत्राचा चतु:सिमा दर्शविणारा स्वाक्षांकित नकाशा व अधिसुचनेच्या प्रारुपसह जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांचे मार्फत उपजिल्हाधिकारी कक्षास पाठवतील.

५. नगर भूमापन विभागाकडुन अहवाल प्राप्त झाले नंतर संबधीत उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा हे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन आणि पुनर्विकास ) अधिनियम १९७१ चे कलम ३ब(१) नुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत नमुद निकषांचे आधारात स्थळपाहणी करतील, त्याबाबतचा पंचनामा, झोपडपट्टी क्षेत्राचे फोटो व व्हिडीओ चित्रीकरण करुन तो प्रकरणात सामिल करतील. (ज्या ठिकाणी आवश्यक असेल तेथे स्थळपाहणी साठी जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांची मदत घेतील.)

६. स्थळपाहणी अंती सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणुन घोषित करणे आवश्यक आहे, याची खात्री पटल्यानंतर, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांना अहवाल सादर करुन सदचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे बाबत कुणाही हितसंबधीतांच्या हरकती अगर अक्षेप मागविणे करीता जाहीर सुचना प्रसिध्द करणे बाबत मान्यता घेण्यात येईल.

७. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांचे मान्यते अंती सदर जाहिर सुचना स्थानिक मराठी व इंग्रजी वृतपत्रात जनसंपर्क अधिकारी, झोपुप्रा यांचे मार्फत प्रसिध्द करण्यात येईल. जाहीर सुचनेची प्रत महिती व तंत्रज्ञान विभागाव्दारे प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर (Web-site) प्रसिध्द करण्यात येईल. तसेच उपजिल्हाधिकारी विभागाव्दारे सदर जाहिर सुचनेची एक प्रत प्रत्यक्ष जागेवर जावून प्रसिध्द करण्यात येईल व त्याबाबतचा पंचनामा व छायाचित्रे प्रस्तावात सामील करण्यात येतील.

८. जाहीर सुचनेच्या अनुषंगाने हरकती अगर आक्षेप प्राप्त न झाल्यास उपजिल्हाधिकारी विभागाव्दारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करणे बाबतच्या अधिसुचनचे प्रारुप मा. सचिव, झोपुप्रा यांचे मार्फत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांचे मान्यते करीता सादर करण्यात येईल.

९. जाहीर सुचनेच्या अनुषंगाने हरकती अगर आक्षेप प्राप्त झाल्यास उपजिल्हाधिकारी विभागाव्दारे अर्जदार व हरकतदार यांची सुनावणी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांचे समक्ष आयोजित करण्यात येईल. सुनावणी अंती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांचे आदेशान्वये पुढील कार्यवाही करण्यात येईल.

१०. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी झोपुप्रा यांनी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करणे बाबतच्या अधिसुचनेस मान्यता दिल्यानंतर उपजिल्हाधिकारी विभागाव्दारे अधिसुचनेच्या प्रती वृतपत्र प्रसिध्दी करीता व राजपत्रात प्रसिध्द करणे करीता जनसंपर्क अधिकारी, झोपुप्रा यांचे कडे, आणि संकेत स्थळावर प्रसिध्द करणे करीता माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठविण्यात येतील.

११. झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे बाबतची न्यायीक प्रकरणे विधी विभागा मार्फत हाताळण्यात येतील व त्यास उपजिल्हाधिकारी विभाग आवश्यक ते सहाय्य करेल.

१२. झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत केले बाबतची अधिसुचना व नकाशाची एक प्रत नगर भूमापन विभागाकडे GIS Data अद्यावत करण्याकरीता पाठविण्यात येईल.

१३. जाहिर सूचना प्रसिद्धी व झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करणेबाबतची अधिसूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेबाबतची देयके मंजूर करण्याची कार्यवाही जनसंपर्क आधिकारी, झोपुप्रा यांचे मार्फत करण्यात येईल.

१४. संबधीत धारीकेचे जतन उपजिल्हाधिकारी विभागाव्दारे करण्यात येईल.

वरील प्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करणे बाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात येत असुन, याप्रमाणे सर्व संबधीतांनी तत्काळ कार्यवाही करावी.

(दीपक कपूर)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.

प्रत - सर्व विभाग प्रमुख झोपुप्रा.

(नमुना अ)

अर्ज

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,

प्रशासकीय इमारत, अनंत काणेकर मार्ग,

बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

**विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे बाबत.**

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील कलम ३(क) (१) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे बाबत.

१. अर्जदार - (नियोजित सह.गृह.संस्था/ जमीन मालक / विकासक / वास्तुविशारद)

२. अर्जदाराचा पत्ता -

३. झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करावयाचे नगर भूमापन क्रमांक / भूकर क्रमांक -

४. घोषित करावयाचे अंदाजे क्षेत्र -

५. घोषित करावयाचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे यापूर्वी दाखल योजनेमध्ये समाविष्ट आहे काय ?

६. असल्यास सदर सहकारी गृहनिर्माण संस्थेचे नाव व विकासकाचे नाव

७. सोबत जोडावयाची कागदपत्रे :-

अ. मिळकत पत्रिका व नगर भूमापन नकाशा तीन महाच्या आतील (मूळ प्रती)

ब. ७/१२ उतारा व कमी- जास्त पत्रक.

क. झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करावयाच्या झोपडपट्टी क्षेत्राचा नगर भूमापन हद्दी दर्शविणारा झोपडीदर्शक नकाशा

ड. अर्जदार सहकारी गृहनिर्माण संस्था असल्यास -

१. मुख्य प्रवर्तक / अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने झोपडीधारकांची यादी.

२. मुख्य प्रवर्तक / अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने झोपडीस्थित कच्चा नकाशा.

इ. अर्जदार जमीन मालकाशिवाय इतर असल्यास -

१. संस्थेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाची प्रत

अथवा झोपडीधारकांचे संमती पत्र.

फ. विकास आराखडा अभिप्राय -

ग. जमिन मालकी हक्काबाबतची कागदपत्रे - उदा. अभिहस्तांतरण करार, कुलमुखत्यार पत्र, विकास करारनामा इ.

ह. जमिन मालकाचे नाहरकत पत्र / संमती पत्र.

च. मतदार यादी १९९५/२०००

छ. सद्यस्थित झोपडपट्टी क्षेत्राची छायाचित्रे.

ज. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने एम्पॅनलमेंट केलेल्या खाजगी सर्व्हे एजन्सी मार्फत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करावयाच्या क्षेत्राच्या बाह्य हद्दीचा झोपड्यांसह ETS / GPS सर्व्हे केलेल्या सर्व्हेक्षणाचा GIS Data (CD मध्ये देण्यात यावा.)

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी